तात्काळ

क्रमांक एस-१९९७-प्र.क्र.२६४/ल-६
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक ७ मार्च १९९८.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,

विषय:-पावसाळी मोहिम - ७/१२ पुनर्लेखन..

उपरोक्त विषयाच्या संदर्भात दि. १४ मे १९९७ रोजी विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या बैठकीत झालेल्या चर्चेमध्ये ठरल्याप्रमाणे महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम, १९७१ च्या कलम ७ नुसार अधिकार अभिलेख १० वर्षाच्या मुदतीनंतर पुन्हा लिहिण्यात यावेत अशी तरतूद आहे. मात्र, काही जिल्ह्यामध्ये १० वर्षाचा कालावधी लोटून गेल्यानंतरही सदर नोंदवह्या पुन्हा लिहिण्यात येत नाहीत. परिणामत: जमिनी संदर्भात अत्यंत महत्वाचे अभिलेख जीर्ण, फाटक्या अवस्थेत रहातात. यास्तव पावसाळ्यापूर्वी सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी गाव निहाय पुनर्लेखनाबाबत आढावा घेऊन ज्या गावच्या अभिलेखाचे पुनर्लेखन झालेले नाही त्याची माहिती संकलित करावी व याबाबत कालबध्द कार्यक्रम आखून सप्टेंबर अखेर पर्यंत पुनर्लेखन काम पुर्ण करुन शासनास अहवाल सादर करावा, असे सुचविण्यात आले होते.

२. तथापि, सदर अहवाल शासनास अद्याप प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. आपणास पुन्हा विनंती करण्यात येते कि, ७/१२ च्या पुनर्लेखनाच्या कामाबाबतचा आपला अहवाल शासनास तात्काळ सादर करण्याची कृपया व्यवस्था करावी.

सही/- चं. भा. म्हात्रे.
कक्ष अधिकारी.
महसूल व वन विभाग.

TAHASILDAR ... 21 APR 1998

xxxx

क्र. कार्यासन-८-आरटीएस-२५६/९८
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर.
दिनांक ६/४/९८

प्रति- तहसिलदार ( सर्व ) शिरोळ

शासनाकडील वरील दि. ७ मार्च १९९८ चे पत्रामध्ये दिले सूचनेनुसार कार्यवाही करुन अहवाल पाठवावा.

जिल्हाधिकारी, कोल्हापूर, करिता.

५४२०/९८